**ठळक बातम्या**

- इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांचा यशस्वी दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परतले

- पुण्यातल्या मोशी कचरा डेपो दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ९ वर

- पंढरपुरकडे निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्याहून मार्गस्थ

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत लिंडा नॉस्कोव्हा अजिंक्य, पुरुष एकेरीच्या विजेतेपदासाठी आज सिनर आणि झ्वेरेव्ह यांच्यात लढत

**आणि**

- राज्यात मान्सूनची गती मंदावल्यानं अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम, येत्या काही दिवसांत पावसाचं प्रमाण तुलनेनं कमी राहील असा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला तीन देशांचा दौरा आटोपून काल नवी दिल्लीत परतले. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी इंडोनेशियाला भेट दिली आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. तर दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्र्यांनी ऑस्ट्रेलियाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला तसंच भारत-ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम दरम्यान दोन्ही देशांच्या प्रमुख उद्योजकांना संबोधित केलं. या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यातली त्यांची न्यूझीलंड भेट ऐतिहासिक ठरली. चार दशकांहून अधिक काळानंतर भारतीय प्रधानमंत्र्यांनी न्यूझीलंडचा केलेला हा दौरा द्विपक्षीय संबंधांना

मोठी चालना देणारा ठरला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्सन यांच्याशी चर्चा केली. संरक्षण, पर्यटन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन तसंच दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन या पाच क्षेत्रांमध्ये यावेळी १० सामंजस्य करार करण्यात आले.

**<><><><><>**

ईपीएफओ म्हणजेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं ६ महिन्यांची विशेष माफी योजना  सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत, प्राप्तीकर कायद्यांतर्गत मान्यताप्राप्त भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट चालवणाऱ्या आस्थापनांना आपलं  पीएफ ट्रस्ट ईपीएफओकडे नियमित करण्याची संधी देण्यात आली आहे.  ज्या कंपन्यांनी स्वतःचा पीएफ ट्रस्ट बनवला आहे, मात्र त्यांच्याकडे सरकारची अधिकृत मंजुरी नाही, त्यांना नियमित होण्याची ही  संधी एकदाच मिळणार आहे.  ही योजना सहा महिन्यांसाठी खुली असेल आणि पात्र आस्थापनांना आपला अर्ज  ई-मेलद्वारे संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठवावा लागेल.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यतल्या मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरणातल्या मृतांची संख्या ९ वर पोहोचली आहे. बचाव कार्यादरम्यान, काल या ठिकाणी आणखी ७ जणांचे मृतदेह सापडले. पुणे जिल्ह्यात मोशी इथं ८ जुलै रोजी एका इमारतीवर कचऱ्याचा ढिगारा कोसळून झालेल्या या  दुर्घटनेत २३ जण अडकले होते. त्यापैकी ५ जण सुरक्षितपणे बाहेर आले. तर ९ जणांची सुटका करण्यात आली.

दुर्घटनेच्या ठिकाणी अद्याप बचाव कार्य सुरु असून, बेपत्ता झालेल्यांचा शोध सुरु असल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

आषाढी एकादशीच्या निमीत्तानं पंढरपुरकडे निघालेली संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्यातला मुक्काम

संपवून पुढे मार्गस्थ झाल्या आहेत. तुकोबांची पालखी आज हडपसरहून तर माऊलींची पालखी सासवडहून पुढे रवाना होईल.

श्री संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी अहिल्यानगर इथं दाखल झाली. बेसिक ट्रेनिंग रेजिमेंट या लष्करी संस्थेच्या वतीने वारकऱ्यांना फराळ तसंच पाण्याचं वाटप करण्यात आलं.

संत मुक्ताई यांच्या पालखीचं काल बीड शहरात आगमन झालं.
पैठणच्या संत एकनाथ महाराजांची पालखीही आज बीड जिल्ह्यात राक्षसभुवन इथल्या मुक्कामावरून पुढे रवाना होईल.

**<><><><><>**

महिला आणि बालविकास विभागाच्या सहकार्यानं महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीनं आषाढी वारी काळात महिला उन्नती वारी हा विशेष उपक्रम राबवण्यात येणार असून या उपक्रमाचा प्रारंभ आज उरळीकांचन इथल्या पालखी तळावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते होत आहे. महिलांपर्यंत शासनाच्या विविध योजना, महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा तसच महिलांच्या हक्कांविषयीची माहिती प्रभावीपणे पोहोचवण्याच्या उद्देशानं महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

**<><><><><>**

अकोल्यात आज बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्या २ कंपन्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे दावे करणाऱ्या या कंपन्यांपैकी एक जालना जिल्ह्यातली तर दुसरी मध्यप्रदेशातली आहे. संबंधित कंपन्यांच्या बियाण्यांच्या क्षमतेबाबत शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पॅकेटवर केलेला दावा बियाणे नियमांची दिशाभूल करणारा

असल्याचं तपासणीत स्पष्ट झालं आहे, अशी माहिती जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी दिली.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला एकेरीत २१ वर्षाच्या लिंडा नॉस्कोव्हा हिनं अजिंक्यपदाला गवसणी घातली. काल झालेल्या अंतिम सामन्यात तिनं कॅरोलाइना मुकोव्हा हिच्यावर ६-२, ५-७, ६-३ असा पराभव केला आणि कारकीर्दीतलं पहिलंवहिलं ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावलं. पुरुष एकेरीत आज संध्याकाळी अग्रमानांकित आणि विद्यमान विजेता यानिक सिनरचा सामना अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांत इंग्लंड आणि अर्जेंटिनानं आपापले सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. इंग्लंडनं अतिरिक्त वेळेत गोल करत नॉर्वेवर २-१ असा विजय मिळवला. तर अर्जेंटिनानं स्वित्झर्लंडवर ३-१ अशी मात केली.

स्पेन आणि फ्रान्सनं याआधीच उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं होतं. आता येत्या बुधवारी उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात फ्रान्स आणि स्पेन यांच्यात लढत होईल. दुसरा उपांत्य सामना गुरुवारी इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यात होणार आहे. दोन्ही सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता सुरु होतील.

स्पर्धेचा अंतिम सामना २० जुलै रोजी न्यूयॉर्क न्यू जर्सी स्टेडियमवर होणार आहे. तर तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना १९ जुलैला होणार आहे.

**<><><><><>**

इंग्लंड आणि भारताच्या महिला क्रिकेट संघात लॉर्ड्स इथं सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर भारतानं दुसऱ्या डावात २६९ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. कालचा खेळ संपला तेव्हा भारतानं दुसऱ्या डावात १ बाद १५४ धावा केल्या होत्या. यास्तिका ३९ तर स्मृती मंधाना ६९ धावा करून खेळपट्टीवर टिकून होत्या.

त्याआधी भारतानं पहिल्या डावात इंग्लंडच्या संपूर्ण संघाला १७० धावांमध्ये माघारी धाडत ११५ धावांची आघाडी मिळवली. भारताच्या वतीनं क्रांती गौड हीनं ३५ धावांत इंग्लंडच्या पाच खेळाडूंना बाद केलं.

**<><><><>**

इंग्लंड मध्ये साऊथअॅम्पन इथं काल झालेल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात भारताचा इंग्लंडनं ५६ धावांनी पराभव केला. यासोबतच इंग्लंडनं पाच सामन्यांची ही मालिकाही ४-० अशी जिंकली. या सामन्यात नाणेफेक जिकूंन भारतानं प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. इंग्लंडचा सलामीवीर जॉस बटरच्या धडाकेबाज १३१ आणि हॅरी ब्रुकच्या फटकेबाज नाबाद ९५ धावांच्या खेळीच्या जोरावर इंग्लंडनं निर्धीरीत २० षटकात २ बाद १५७ धावा केला. विजयासाठी २५८ धावांचा पाठलाग करताना भारताच्या इशान किशन आणि तिलक वर्मा या दोघांनी अर्धशतकी खेळी केली. मात्र भारत २० षटकात ८ बाद २०१ धावाच करू शकला.

**<><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा इथल्या समाजकल्याण विभागाच्या शासकीय निवासी शाळा आणि वसतिगृहात काल रात्री विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शहादा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यापैकी सहा विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना खासगी रुग्णालयात हलवण्यात आलं.

**<><><><>**

गेल्या दहा दिवसांपासून कामबंद आंदोलनावर असलेल्या तुमसर नगरपरिषदेतल्या ६० कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांनी प्रशासनाविरोधात शुक्रवारपासून अधिक तीव्र आंदोलन पुकारलं आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून रखडलेलं वेतन, किमान वेतनाचा लाभ न मिळणं आणि सुरक्षेसाठी आवश्यक मूलभूत साहित्याचा पुरवठा न होणं, या मागण्यांसाठी कामगारांनी मुख्याधिकाऱ्यांच्या गाडीला घेराव घातला. यानंतर ठोस आश्वासन न मिळाल्यानं, न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवायचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला आहे.

**<><><><>**

कर्नाटक मध्ये बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या दोन पाकिस्तानी नागरिकांना पोलिसांनी आज चिक्कबल्लापूर इथून अटक केली. या दोघांनी आपलं खरं नागरिकत्व लपवून अवैधरीत्या शिधा पत्रिका आणि मतदार ओळखपत्र देखील मिळवलं होतं, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><>**

राज्यात मान्सूनची गती मंदावल्यानं अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम आहे. राज्यात येत्या काही दिवसांमध्ये पावसाचं प्रमाण तुलनेनं कमी राहील अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, गोवा आणि घाटमाथ्यावर काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार सरी पडतील. मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तर विदर्भात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, आणि जोरदार वारे वाहतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**